**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई या कार्यालयाचे नाव व कार्यालयाच्या अधिपत्याखालील विविध पदांचे पदनाम बदलण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : व्यासुआ-०६२६/प्र.क्र.१०७/काम-१**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- २७ जुलै, २०२६.**

वाचा :-

१. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एमएससी ८०८१/(१९८९)/काम-६, दिनांक २३ ऑगस्ट १९८४.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एमएससी ८०८१/(१९८९)/काम-६, दिनांक १५ मार्च १९८५.
३. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एमएससी ८०८६/(३९४९)/काम-६, दिनांक २० जानेवारी १९८७.
४. मुख्य कारखाने निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक सीआयएफ/स्थापना/३६७९९/२, दिनांक ७ सप्टेंबर १९९०.
५. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एफडीपी ४५९०/(८०४६)/काम-८, दिनांक १५ जानेवारी १९९१.
६. शासन निर्णय क्रमांक एफडीई ४५९०/(८०४६)/काम-८, मंत्रालय, मुंबई-३२, दि.१६.०१.१९९१.
७. व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थिती संहिता, २०२० (२०२० चा क्रमांक ३७), दि.२९ सप्टेंबर २०२०.
८. कामगार आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना, दिनांक २१ नोव्हेंबर २०२५.
९. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे पत्र क्र. औसुवआ/गोपनीय शाखा/ ९५२/२ दि.१८.०५.२०२६

**प्रस्तावना :**

उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या २३ ऑगस्ट १९८४; १५ मार्च, १९८५ आणि २० जानेवारी, १९८७ च्या शासन निर्णयान्वये, मुख्य कारखाने निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना “विभाग प्रमुख” म्हणून घोषित करण्यात आले असून दि. १५ जानेवारी, १९९१ च्या शासन निर्णयान्वये त्यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले. तसेच, संदर्भाधीन क्र. ६ येथील दि.१६.०१.१९९१ अन्वये कारखाने निरीक्षणालयाच्या नावात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय असा बदल करून पदांचे पदनाम सुधारीत करण्यास मान्यता देण्यात आली होती.

आता, केंद्र शासनाने दि. २१ नोव्हेंबर, २०२५ रोजी “व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता, २०२०” लागू केली आहे. या संहितेच्या अंमलबजावणीनंतर, अंमलबजावणी यंत्रणा आणि अधिका-यांची पदनामे या संहितेच्या तरतुदींशी सुसंगत करणे आवश्यक आहे. त्यानुसार, औद्योगिक

सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या नावामध्ये व संचालनालयाच्या अधिनस्त पदांचे पदनाम बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

केंद्र शासनाच्या "व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संहिता, २०२०" मधील तरतूदीनुसार संचालनालयाच्या नावात **"औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई"** ऐवजी **"व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई"** असा बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध अधिकाऱ्यांच्या पदनामात खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | सद्याचे पदनाम | व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थिती संहितेचे कलम व व्याख्या | सुधारित पदनाम |
|---|---|---|---|
| १ | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | **कलम ३४(५)**<br>**मुख्य निरीक्षक-नि-सुविधाकार** | संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |
| २ | अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | **कलम ३४(६)**<br>**अपर मुख्य निरीक्षक-नि-सुविधाकार** | अपर संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |
| ३ | सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | **कलम ३४(६)**<br>**सह मुख्य निरीक्षक-नि-सुविधाकार** | सह संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |
| ४ | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य (वैद्यकीय) | **कलम ४२(१)**<br>**वैद्यकीय अधिकारी** | वैद्यकीय अधिकारी, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |
| ५ | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | **कलम ३४(१)**<br>**निरीक्षक-नि-सुविधाकार** | उपसंचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |
| ६ | सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | **कलम ३४(१)**<br>**निरीक्षक-नि-सुविधाकार** | सहाय्यक संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य |

२. वरीलप्रमाणे व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील पदांचा आकृतीबंध व विविध पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२७१६५७३९६३५४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BABASAHEB SITARAM SHINDE

Digitally signed by BABASAHEB SITARAM SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=1706E7B903EB05A5F1C405F3795499452AF658B876E10B22 3A0CEF893B6B6689, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CC0323A0A674CB4C457CBB6B2C0F8B750E0EE28B3C ABD66F127CF1EF467412AE, cn=BABASAHEB SITARAM SHINDE
Date: 2026.07.27 16:59:02 +05'30'

**(बा. सि. शिंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

४) संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
५) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७) संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) संचालक, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०) उप सचिव (कामगार-१) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवडनस्ती (कामगार-१).